नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक संचालित

# कै बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, नाशिक रोड

# मराठी अर्थशास्त्र परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## डॉ सुधा मोकाशी २०२२-२०२३ उपक्रमांतर्गत

## ' महाराष्ट्रातील जलसंधारण व मत्स्य व्यवसाय ' व्याख्यान २०/०३/२०२३

## प्रमुख व्याख्याते : मा श्री सं. पां. वाटेगावकर ( प्रादेशिक उपायुक्त, मत्स्य व्यवसाय, नाशिक)

## कार्यक्रम अहवाल

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय नाशिक रोड तसेच मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित **'डॉ.सुधा मोकाशी 2022 - 2023'** उपक्रमांतर्गत *'महाराष्ट्रातील जलसंधारण व मत्स्य व्यवसाय' या विषयावरील व्याख्यान* दिनांक 20 मार्च 2023 रोजी संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. कार्यक्रमाचे समन्वयक, डॉक्टर जीवन सोळुंके यांनी आपल्या प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील भूमिका आणि उद्देश स्पष्ट केला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.दीपा होळकर यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्यांचं स्वागत आणि सत्कार महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर समीर लिंबारे यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते, मा. श्री संजय पांडुरंग वाटेगावकर, प्रादेशिक उपायुक्त, मत्स्य व्यवसाय नाशिक, यांनी *'मत्स्य व्यवसाय'* या संदर्भात आपले बीज भाषण केले. आपल्या बीज भाषणात त्यांनी भारतातील एकंदरीतच अन्नधान्य निर्मितीचा विचार करता मत्स्य व्यवसायाचा प्रचार, प्रसार व त्या संदर्भातील योजना जनसामान्यापर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले. महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी ही मत्स्य व्यवसाय विषयीची माहिती जनसामान्य पर्यंत पोहोचावी असे आवाहन केले. मत्स्य व्यवसायासाठी 60 टक्के महिलांसाठी अनुदान दिले जाते, तसेच उदगीर, रत्नागिरी नागपूर, इत्यादी ठिकाणी फिशरी कॉलेजेस आहेत, मत्स्य व्यवसाय विभागाची संरचना, कार्य आणि योजना यांची सर्व माहिती वाटेगावकर सरांनी उपस्थितांना दिली. मत्स्य व्यवसायाकडे व्यवसाय म्हणून बघावे असे आवाहन त्यांनी केले. तुलनेने मत्स्य व्यवसायास नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत नाही, कमी मनुष्यबळ लागते, मत्स्य आहाराचे फायदे, तसेच अन्नाची कमतरता किंवा अन्नधान्याचा तुटवडा भरून काढण्यासाठी मत्स्य व्यवसायाचे योगदान, याविषयी वाटेगावकर सरांनी माहिती दिली. विविध योजना उदाहरणार्थ निलक्रांती, प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना आणि अनुदान, कोल्ड स्टोरेज. मत्स्यखाद्य, ई सेवा केंद्र. तलाव, ठेका देण्याची पद्धती, मत्स्य व्यवसायाचे प्रकार, इत्यादी विषयी माहिती वाटेगावकर सरांनी आपल्या बीज भाषणातून दिली.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रातील व्याख्यानात मा. श्री तुषार पवार, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दुग्ध व्यवसाय, नाशिक यांनी ***'जलसंधारण व मत्स्यव्यवसाय'*** याबाबत माहिती दिली. तुषार पवार यांनी पाण्याच्या नियोजनाचे महत्त्व, पाण्याचा साठा करण्याचे महत्त्व, तलाव, बांध, झालसा, विहीर, कुंड इत्यादी विषयी माहिती दिली. पाणी बाणी येऊ नये म्हणून करावयाच्या उपायोजना तसेच जलसिंचनाचे महत्त्व त्यांनी आपल्या सत्रात विशद केले. आदिवासी बांधवांना एकत्रित करून सहकारी संस्था नोंदणी करणे तदनंतर व्यवसायास मदत करणे, अडीअडचणी सोडवणे, संस्थेचे ऑडिट, इलेक्शन इत्यादी मध्ये मदत करणे यासंदर्भात श्री तुषार पवार यांनी माहिती दिली.

मा. डॉ. अविनाश निकम, कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. निकम यांनी अर्थशास्त्र परिषदेविषयीची माहिती, परिषदेचा इतिहास त्यात प्रामुख्याने 45 अधिवेशना संदर्भातील माहिती, विविध उपक्रम, व्याख्यानमाला, अनुदान याविषयीची माहिती दिली. मत्स्यव्यवसाय ही एक संधी आहे. भारताला बराच मोठा समुद्रकिनारा लाभलेला आहे त्याचा साधन संपत्ती म्हणून विकास होण्याच्या दृष्टीने मत्स्य व्यवसायाचे महत्त्व त्यांनी विशद केले.

कार्यक्रमास महिला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आफरीन मनियार यादेखील उपस्थित होत्या. त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये महिला महाविद्यालयाने मोलाची भर घातली. तसेच महिला महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या उपक्रमातून व्यक्तिमत्व कसे घडत गेले याविषयीचे मत आफरीन मनियार यांनी मांडले.

महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. समीर लिंबारे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व सन्माननीय अतिथींचे स्वागत केले. व्याख्यानमालेकडे उद्योजकतेच्या अनुषंगाने बघावे आणि आत्मनिर्भर बनावे असे आव्हाने प्राध्यापक डॉक्टर समीर लिंबारे यांनी केले. तसेच महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनी मत्स्य व्यवसायाविषयी अधिकची माहिती आणि प्रशिक्षण मत्स्यव्यवसाय विभागास भेट देऊन घेतील अशी आशाही व्यक्त केली.

अर्थशास्त्र विभागाचे डॉ. गोरखनाथ वाकळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास श्रीमती कोकीळ मॅडम तसेच प्रा.डॉ. सुभाष सावंत महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.